माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ७२२/२०१९**

**अपीलकर्ता** श्री. शरद तुकारामजी गावंडे,
स्वागत कॉलनी, पो. मानसमंदिर, वर्धा
ता.जि. वर्धा-४४२००१

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली,
ता.अहेरी जि. गडचिरोली

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,**
गडचिरोली ता.जि.गडचिरोली-४४२६०५

**आदेश पारित दिनांक : ३१.०१.२०२०**

| प्रपत्रांचा तपशिल | दिनांक |
|---|---|
| प्रपत्र अ (माहिती अर्ज) | १४.०९.२०१८ |
| जन माहिती अधिकारी यांचा प्रतिसाद | १५.०९.२०१८ |
| प्रपत्र ब (प्रथम अपील अर्ज) | २८.१०.२०१८ |
| प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला आदेश | १२.१२.२०१८ |
| प्रपत्र क (व्दितीय अपील अर्ज) | ०५.०३.२०१९ |
| आयोगाकडील सुनावणी | ३१.०१.२०२० |

अपीलकर्ता यांनी आयोगाकडे "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही" असे कारण नमुद करून व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ३१.०१.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री. व्हि.एन.आडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, श्री. अनंत सोमकुवर उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, श्री. सु.रा. डोंगे उपस्थित आहेत.

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४.०९.२०१८ रोजी माहितीचा अर्ज सादर केला. सदर माहिती अर्जात त्यांनी "ऑगस्ट २०१८ ते आजपावेतो पर्यंतचा कालावधीतील माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती व्यक्तिश: मागितली असता, उपलब्ध माहिती व्यक्तिश: न देता टपालाने पाठविण्यासाठी असलेल्या शासकीय नियमाची प्रत देण्यात यावी तसेच व्यक्तिश: मागितलेली माहिती टपालाने पाठविण्याच्या कारणाचा संपूर्ण तपशिलाची माहिती" मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती व्यक्तिश: घेवून जाण्याकरिता वारंवार कार्यालयात बोलाविले, परंतु ते

आले नाहित, त्यामुळे माहिती पुरविणे शक्य झाले नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाचे आंत देण्यात यावी, असे आदेशित करून अपील निकाली काढलेली आहे.

आज रोजी द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलकर्ता यांनी माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती मागितलेली असल्याने त्यांना वारंवार कार्यालयात माहिती प्राप्त करून घेण्यासाठी कळविण्यात आले परंतु ते हजर झाले नाही. अपिलार्थी यांनी "मी माहिती घेणार नाही", असे प्रतिउत्तर आवक जावक शाखेस दिल्याने अपिलार्थीस माहिती टपालाने पाठविली. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तक्रारवजा असल्याने तसेच कलम २(च) च्या व्याखेत बसत नसल्याने माहिती देय होत नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती तसेच अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तोंडी व लेखी खुलासा तसेच प्रकरणातील दाखल कागदपत्रे विचारात घेता केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१०) नूसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

**१. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तक्रारवजा असल्याने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) च्या व्याख्येत बसत नसल्याने माहिती देय होत नाही.**

**२. सबब, प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(संभाजी सरकुंडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

जावक क्रमांक ---1931---- दिनांक 22 JUN 2020

Desktop/A/M/S/722-Gawande